8 March 2019

# जंगल संवर्धनाची ठोस पॉलिसी हवी

महिलांचा जाहीरनामा

सध्या झाडे, जंगले कमी होत असल्याने तापमानात वाढ होत आहे. सरकार काही प्रमाणात प्रयत्न करत आहे. पण त्यांचे प्रयत्न शासकीय जमिनीवरच होत आहेत. खासगी पातळीवर मात्र काही होताना दिसत नाही. पण खासगी क्षेत्रातही जंगल निर्माण करण्याचा ध्यास दोन पर्यावरणप्रेमी तरुणींनी घेतला आणि त्यासाठी संस्थाही स्थापन केली. जंगल तयार करण्यातही करिअर होऊ शकते हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यांचे नाव केतकी घाटे आणि मानसी करंदीकर आहे.

या दोघींना पर्यावरणाची आवड असल्याने याच क्षेत्रात काम करण्याचा निर्धार त्यांनी केला. गेली अनेक वर्षांपासून त्यांनी जंगल निर्माण व्हावे यासाठी काम सुरु केले आहे. या संदर्भात घाटे म्हणाल्या, आम्ही पर्यावरण जपण्यासाठी पूर्णवेळ काम करतो. जमिनीची जैवविविधता टिकण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी देशी झाडे लावण्यावर भर दिला पाहिजे. सध्या फार्महाऊस तयार केले जाते. पण त्यात कृत्रिम लॉन करण्यावर भर असतो. परदेशी झाडे लावतात. त्याने पर्यावरणाचे संवर्धन होत नाही. परंतु आम्ही देशी झाडे, फुले लावतो. पक्षी, फुलपाखरं ज्या वनस्पतीकडे आकर्षित होतात त्यावर भर देतो. एखाद्या ठिकाणी नैसर्गिक जंगल तयार करायचे असेल तर तिथल्या मातीचे सर्वेक्षण केले जाते. अशाच प्रकारचे दोन मोठे प्रकल्प पानशेतजवळ शिरकोळी गावात २४ एकरावर आणि कोयना धरणाजवळ ६० एकरावर एक प्रकल्प आहे. तिथे अजून बरेच काम व्हायचे आहे. जंगल लगेच तयार होत नाही. त्यासाठी खूप वर्षे जावे लागतात, असे केतकी घाटे यांनी सांगितले. सध्या उत्सर्जन वाढत आहे. ते कमी करण्यासाठी आपण आपली नवीन वस्तू खरेदी करण्यावर पायबंद लावायला हवा. कारण जेवढे आपण नवीन वस्तू घेऊ तेवढे उत्सर्जन वाढेल. गरजा कमी करून वस्तूंचा पुनर्वापर करायला हवा.



## सरकारने काय करावे?

- पर्यावरण संवर्धनाची पॉलिसी तयार व्हावी
- नदीमधील परिसंस्था नष्ट झाली आहे. ती पुनरुज्जीवित करायला हवी
- घरातील ८0 टक्के सांडपाणी थेट नदीत जाते, ते थांबवावे
- साबण, कपडे धुणेचे पावडर पर्यावरणपूरक तयार व्हावे
- हानिकारक गोष्टींवर सरकारने वचक ठेवावा.
- प्लास्टिकचे प्रमाण कमी झाले आहे. ते संपूर्णपणे नष्ट करावे